# <u>रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. ६४/२०११ मधील नि. २६ वरील आदेश</u>

प्रस्तुत अर्ज वादींनी दाखल करुन नि.क्र. २५ वरील अर्ज मंजुर करताना १००/— रुपये खर्चाचा आदेश झालेला आहे व ती खर्चाची रक्कम सरकार जमा करणेचा आदेश झाला आहे तो रद्द करणेची मागणी केली आहे. वादींनी अर्जामध्ये न्यायालयाने घाई गडबडीत प्रतिवादी क्र. २ करीता तजविज केली नाही म्हणुन दावा त्याच्या विरुध्द खारीज केला होता, वादींनी प्रतिवादी क्र. २ विरुध्द रजिस्टर पोस्टाने समन्स काढावे या करीता १२—३० वाजता अर्ज दिला होता असे कथन केलेले आहे. या ठिकाणी हे नमुद करणे आवश्यक आहे की, सर्व वकिलांच्या सोयी नुसार सकाळच्या सत्रामध्ये दिवाणी कामकाज चालविण्यात येते जेंव्हा प्रस्तुत प्रकरण कोर्टा समोर आले तेंव्हा वादी व त्यांच्या वकिलांचा तीन चार वेळस पुकारा करुन ते गैरहजर राहिले, मागच्या तारखेस वादीला तजविज करणे करीता शेवटची संधी दिली होती त्यावेळेला देखिल वादी गैरहजर होते, त्यापुर्वी देखिल अनेक तारखांना वादी गैरहजर राहिलेले आहेत व आज जेंव्हा प्रकरण तीन वेळेस पुकारले तेंव्हा देखिल वादी हजर राहिले नाहीत त्यामुळे वादींना प्रतिवादी क्र. २ विरुध्द दावा चालविणेत रस नाही असे गृहीत धरुन व कोर्टा समोर दुसरा कुठलाही पर्याय नसल्यामुळे प्रतिवादी क्र. २ विरुध्द दावा खारीज करणेचा आदेश नि.क्र. १ वर करण्यात आला त्यावेळे पर्यंत वादी किंवा त्यांचे वकिल किंवा त्यांनी दिलेला तथाकथीत अर्ज न्यायालयासमोर नव्हता असे असतानाही वादींनी बेजबाबदारपणे प्रस्तुत अर्जामध्ये कथन करुन न्यायालयाने घाईगडबडीने आदेश केला असे कथन केलेले आहे. त्यानंतर थोडया वेळाने येवुन नि.क्र. २५ वर अर्ज देवुन प्रतिवादी क्र. २ विरुध्द झालेला आदेश रद्द होवुन दावा प्रतिवादी क्र. २ विरुध्दचा फेलावर घ्यावा अशी विनंती केली. अर्ज त्याच दिवशी दाखल झालेला असल्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वा नुसार संधी देवुन १००/— रुपये खर्चावर अर्ज मंजुर करणेत आला व खर्चाची रक्कम सरकार जमा करणेस वादीस आदेश दिला. परंतु

प्रस्तुत अर्जामध्ये सरकार या दाव्यात पार्टी नाही, सरकारला कॉस्ट देणेचे कारण नाही असे कथन केलेले आहे. हे खरे आहे की, सरकार या दाव्यात पार्टी नाही परंतु प्रतिवादी देखिल प्रस्तुत प्रकरण निघाले तेंव्हा उपस्थित नव्हते, वादीस अनेक संधी देवुनही त्यांनी प्रतिवादी क्र. २ विरुध्द तजविज केली नव्हती यामध्ये न्यायालयाचा महत्वपुर्ण वेळ गेलेला आहे याचा विचार करुन कॉस्टची रक्कम सरकार जमा करणेचा आदेश केलेला होता परंतु वादींनी प्रस्तुत अर्ज रक्कम सरकार जमा करणेचा आदेश रद्द करावा अशी मागणी केली. या ठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, न्यायालयाचा वेळ वादींमुळे विनाकारण गेलेला आहे करीता खर्चाची रक्कम सरकार जमा करणे उचित होते या कारणास्तव अर्जामध्ये कुठलेही तथ्य आढळुन येत नाही म्हणुन खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज फेटाळण्यात येतो.

ठिकाण : पाटण (किरण रं. देशपांडे)
दिनांक : २१/०८/२०१३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पाटण